महाराष्ट्र शासन
कृषि विभाग
नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प
३० अर्केड, वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड, मुंबई ४०० ००५
दूरध्वनी क्र. ०२२-२२१६३३५१/५२ ई-मेल : pmu@mahapocra.gov.in

NDKSP-२२०१९(२१)/१६/२०२५-DBT दि. २८/ १० /२०२५

प्रति,

१. विभागीय कृषि सहसंचालक (प्रकल्पांतर्गत सर्व)
२. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी (प्रकल्पांतर्गत सर्व)

विषय : नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पांतर्गत राबविण्यात येणाऱ्या वैयक्तिक लाभाच्या घटकांच्या मार्गदर्शक सूचना निर्गमित करणे बाबत ..

संदर्भ :- १. शासन निर्णय क्र.नादेकृ ४६२२/प्र.क्र.९४/८-अ, दि. १४/१०/२०२४.
२. शासन निर्णय क्र.कृवपदुम-१९०४६/३६/२०२५-MAG-8A (E-११६८०५०),
दि. ०८/०७/२०२५.

उपरोक्त विषयान्वये महाराष्ट्र शासनाच्या कृषि विभागांतर्गत, जागतिक बँकेच्या अर्थसहाय्याने नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्यासाठी दिनांक १४ ऑक्टोबर २०२४ च्या शासन निर्णयानुसार राज्यातील एकूण २१ जिल्ह्यांमधील ७,२०१ गावे निवडण्यात आली आहेत. तसेच नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प, टप्पा-२ च्या अंमलबजावणीस व जागतिक बँकेसोबत करारनामा करण्यास दिनांक ०८ जुलै २०२५ च्या शासन निर्णयानुसार मान्यता देण्यात आली आहे. प्रकल्पाचा प्रमुख उद्देश शेतकऱ्यांना बदलत्या हवामानाशी जुळवून घेण्यासाठी सक्षम करणे व कृषी आधारित उपजीविकेची साधने उपलब्ध करून शेती किफायतशीर करणे हा आहे. बदलत्या हवामानाचा शेतीला कमीत कमी फटका बसेल यासाठी गावनिहाय नियोजन करण्यात येत असून प्रकल्पांतर्गत वैयक्तिक शेतकऱ्यांना हवामान अनुकूल तंत्रज्ञानाचा अवलंब करणेसाठी विविध घटक राबविण्यात येणार आहेत. त्याअनुषंगाने सोबत जोडलेल्या **परिशिष्ट अ** मध्ये नमूद केलेले घटकांच्या अंमलबजावणीसाठीच्या मार्गदर्शक सूचना या पत्रासोबत सहपत्रीत करण्यात येत आहेत.त्यानुसार प्रकल्पांतर्गत गावांमध्ये सदर घटकांची अंमलबजावणी करण्यात यावी. तसेच उर्वरित वैयक्तिक लाभाच्या घटकांच्या मार्गदर्शक सूचना यथावकाश निर्गमित करण्यात येतील.

सोबत : घटकनिहाय मार्गदर्शक सूचना

(परिमल सिंह)
प्रकल्प संचालक
नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प,मुंबई

प्रत- १. मा. अपर मुख्य सचिव (कृषि), महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
२. आयुक्त कृषि, महाराष्ट्र राज्य, पुणे.

# वैयक्तिक शेततळे
## (इनलेट आऊटलेट सिल्ट ट्रॅप खोदाईसह शेततळे/ इनलेट आऊटलेट विरहित शेततळे)

**प्रस्तावना:**

हवामान बदलामुळे राज्याच्या शेतीवर विपरीत परिणाम होत असून, विशेषतः मराठवाडा व विदर्भातील शेतकऱ्यांना दुष्काळ, भूगर्भातील पाणीसाठा कमी होणे आणि जमिनीच्या आरोग्यावर परिणाम यांचा सामना करावा लागत आहे, ज्यामुळे पिकांची उत्पादकता घटत आहे. याशिवाय, राज्यातील पर्जन्यावर आधारित कोरडवाहू शेतीमध्ये पाणलोट व जलसंधारणाच्या माध्यमातून उत्पादकता वाढविण्यासाठी शेततळे योजना अनुदानावर राबविण्यात येत असून, यामुळे शेतकऱ्यांचे उत्पादन, उत्पन्न आणि जीवनमान उंचावण्यास मदत झाली आहे. प्रतिकूल परिस्थितीत अल्पभूधारक शेतकऱ्यांवर हवामान बदलाचा मोठा परिणाम होत असून, त्यांना परिस्थितीशी जुळवून घेण्यास सक्षम करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने जागतिक बँकेच्या सहाय्याने नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प हाती घेतला आहे.

राज्यातील ८२ टक्के शेती ही कोरडवाहू असून, पावसाचे असमान वितरण व अनिश्चित खंड ही प्रमुख समस्या आहे. त्यामुळे सिंचना अभावी पिकांचे उत्पादन घटते किंवा काही वेळा पिके नष्ट होऊन शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होते. यावर उपाय म्हणून पावसाळ्यात ओढे, नाले, नद्या यामधून वाहून जाणारे अतिरिक्त पाणी शेततळ्यांमध्ये साठवून संरक्षित सिंचनाची सुविधा निर्माण करणे आवश्यक आहे. सद्यस्थितीत राज्यातील दुष्काळजन्य परिस्थिती लक्षात घेता, शेतकऱ्यांना संरक्षित सिंचनाची सुविधा उपलब्ध व्हावी यासाठी जागतिक बँकेच्या अर्थसहाय्याने नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पांतर्गत वैयक्तिक शेततळे हा घटक राबविणे प्रस्तावित आहे.

**उद्दिष्टे:**

१. प्रकल्पांतर्गत निवडलेल्या गावामधील अल्प व अत्यल्प भूधारक शेतक-यांना हवामान बदलामुळे उद्भवलेल्या परिस्थितीशी जुळवून घेण्यास सक्षम बनविणे.
२. संरक्षित सिंचनाची सुविधा निर्माण करणे.
३. दुबार पिकाखालील क्षेत्र वाढविणे व शेतकऱ्याच्या उत्पन्नात वाढ करणे.
४. शेततळ्याच्या माध्यमातून फळे व भाजीपाला पिके, मत्स्योत्पादन, बागायत, आणि पशुपालन यांसारख्या पूरक शेती उपक्रमांना प्रोत्साहन देणे
५. जलस्रोतांचे संवर्धन करून, भूजल पातळी सुधारण्यासाठी योगदान देणे.

**लाभार्थी निवडीचे निकष :**

१. प्रकल्पांतर्गत वैयक्तिक शेततळे या घटकासाठी ५ हेक्टर पर्यन्त जमीन धारणा असलेल्या शेतकऱ्यांमधून अनुक्रमे अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, महिला, दिव्यांग व सर्वसाधारण या प्राधान्यक्रमानुसार लाभार्थी निवड करण्यात येईल.
२. शेतक-याकडे स्वत:च्या नावावर किमान ०.४० हेक्टर क्षेत्र असावे.
३. निवडलेल्या आकारमानाच्या शेततळ्यासाठी तांत्रिक निकषानुसार योग्य जागा लाभार्थ्याकडे उपलब्ध असणे आवश्यक आहे.
४. अर्जदार शेतक-याने यापूर्वी मागेल त्याला शेततळे, सामूहिक शेततळे अथवा भात खाचरातील बोडी अथवा इतर कुठल्याही शासकीय योजनेतून शेततळे या घटकाकरीता शासनाच्या अनुदानाचा लाभ घेतलेला नसावा.

**शेततळ्यांच्या जागा निवडीसाठी तांत्रिक निकष :**

१. ज्या जमिनीतून पाणी पाझरण्याचे प्रमाण कमी आहे अशी जमिन असलेल्या जागेची निवड करावी.

२. काळी जमिन ज्यात चिकण मातीचे प्रमाण जास्त आहे अशा जमिनी शेततळ्यास योग्य असल्याने अशा जमिनीची निवड करण्यात यावी.

३. वालुकामय सच्छिद्र खडक असलेली जागा शेततळ्याकरिता निवडू नये.

४. क्षेत्र उपचाराची कामे झालेल्या पाणलोट क्षेत्रात शेततळी प्राधान्याने घेण्यात यावीत.

५. ज्या ठिकाणी जमिनीचा उतार सर्वसाधारण ३ टक्क्याचे आत आहे, त्या ठिकाणी शेततळे घेण्यात यावे.

६. नाल्याच्या/ओहोळाच्या प्रवाहात शेततळे घेण्यात येवू नये.

७. इनलेट / आऊटलेटसह शेततळ्यासाठी पाणलोट क्षेत्रातून येणारे पाणी (अपधाव) हे शेततळ्याच्या पाणीसाठा क्षमतेपेक्षा जास्त असणे बंधनकारक राहील.

८. इनलेट / आऊटलेट विरहीत शेततळ्यासाठी पुनर्भरणाकरीता अतिरिक्त अपधाव/पाणी उपलब्ध असल्याची खातरजमा करण्यात यावी.

९. टंचाईग्रस्त भागातील लाभ क्षेत्रात शेततळी घेण्यात यावीत. यासाठी जलसंपदा विभागाचा शा. नि. क्रं. सीडीए-१०१५/२६/१५/लाक्षेवी (कामे), दि.१२ मार्च २०१५ मधील अटी व शर्ती लागू राहतील.

१०. सभोवतालची जमिनी दलदल व चिबड होईल तसेच शेततळ्यातून पाणी पाझरून लगतच्या शेतकऱ्याच्या स्थावर/जंगम मालमत्तेचे नुकसान होईल अशा जमिनी निवडण्यात येवू नयेत.

११. शेततळयाचे आकारमान निश्चित करताना खोदाईनंतर निघणाऱ्या मातीपासून शेततळ्याच्या भोवती भराव तयार करण्यासाठी व्यापली जाणारी जागा व स्वत:च्या मालकीचे क्षेत्र विचारात घेवून, आकारमान शेततळयाचे करण्यात यावे.

**वैयक्तिक शेततळे आकारमान व खोदकामाचे परीमाण निहाय अर्थसहाय्य:**

या घटकांतर्गत खालील प्रमाणे विविध आकारमानाच्या शेततळ्यांपैकी कोणत्याही एका आकारमानाच्या शेततळ्याची मागणी करता येईल. आकारमान निहाय शेततळ्याचे अपेक्षित खोदकाम व अनुदानाचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

**अ. इनलेट आऊटलेट सह शेततळे- (रक्कम रुपये)**

| अ.क्र. | शेततळ्याचे आकारमान (मीटर) | बाजू उतार (१:१) | | बाजू उतार (१:१.५) (काळ्या मातीमध्ये) | |
|---|---|---|---|---|---|
| | | खोदकामाचे परिमाण (घ.मी.) | देय अनुदान | खोदकामाचे परिमाण (घ.मी.) | देय अनुदान |
| १. | १५ X १५ X ३ | ४४१ | २३८८१ | ३५१ | १९६९३ |
| २. | २० X १५ X ३ | ६२१ | ३२०३४ | ५०८.५० | २६७९९ |
| ३. | २० X २० X ३ | ८७६ | ४३६७८ | ७४१ | ३७३९५ |
| ४. | २५ X २० X ३ | ११३१ | ५५३२१ | ९७३.५० | ४७९९१ |
| ५. | २५ X २५ X ३ | १४६१ | ७०४५५ | १२८१ | ६२०७८ |
| ६. | ३० X २५ X ३ | १७९१ | ७५००० | १५८८.५० | ७५००० |
| ७. | ३० X ३० X ३ | २१९६ | ७५००० | १९७१ | ७५००० |
| ८. | ३४ X ३४ X ३ | २८९२ | ७५००० | २६३१ | ७५००० |

**ब. इनलेट आऊटलेट विरहित शेततळे-**

| अ.क्र. | शेततळ्याचे आकारमान (मीटर) | बाजू उतार (१:१) | | बाजू उतार (१:१.५) (काळ्या मातीमध्ये) | |
|---|---|---|---|---|---|
| | | खोदकामाचे परिमाण (घ.मी.) | देय अनुदान | खोदकामाचे परिमाण (घ.मी.) | देय अनुदान |
| १. | १५ X १५ X ३ | ४४१ | १८६२१ | ३५१ | १४४३३ |
| २. | २० X १५ X ३ | ६२१ | २६७७४ | ५०८.५० | २१५३९ |
| ३. | २० X २० X ३ | ८७६ | ३८४१७ | ७४१ | ३२१३५ |
| ४. | २५ X २० X ३ | ११३१ | ५००६१ | ९७३.५० | ४२७३१ |
| ५. | २५ X २५ X ३ | १४६१ | ६५१९४ | १२८१ | ५६८१८ |
| ६. | ३० X २५ X ३ | १७९१ | ७५००० | १५८८.५० | ७०९०४ |
| ७. | ३० X ३० X ३ | २१९६ | ७५००० | १९७१ | ७५००० |
| ८. | ३४ X ३४ X ३ | २८९२ | ७५००० | २६३१ | ७५००० |

**संदर्भ:** जा.क्र. कृआ/ वैयक्तिक शेततळे/ मार्गदर्शक-सूचना /मृद-७/३७२३२/२२ दि. ०७/११/२०२२ : "मुख्यमंत्री शाश्वत कृषि सिंचन योजनेअंतर्गत वैयक्तिक शेततळे अंमलबजावणीकरीता मार्गदर्शक सूचना २०२२-२३".

- विविध आकारमानाच्या शेततळ्यासाठी कमाल रक्कम रुपये ७५०००/- (अक्षरी रक्कम रूपये, पंच्याहत्तर हजार मात्र) रकमेच्या मर्यादेत अनुदान देय राहील.
- शेततळ्यासाठी वरील आकारमान दर्शविण्यात आले असले तरी शेत परिस्थितीनुसार अथवा स्थानिक अडचणीमुळे आकारमानात बदल अथवा शेततळयाची लांबी, रुंदी कमी जास्त करण्याची आवश्यकता भासल्यास त्याप्रमाणे बदल करण्यास मुभा राहिल तथापि अशी मंजूरी खालील अटींच्या अधिन राहून देता येईल.

  I. मंजूर आकारमानापेक्षा **जास्त आकारमानाचे** शेततळ्याचे प्रत्यक्ष खोदकाम झाल्यास पूर्वसंमती नुसार मंजूर आकारमानाचे शेततळ्यासाठी देय अनुदानानुसार अनुदान देय राहील व जास्तीचा खर्च हा लाभार्थी शेतक-याने स्वतः करावयाचा आहे.
  II. मंजूर आकारमानापेक्षा **कमी आकारमानाचे** शेततळ्याचे प्रत्यक्ष खोदकाम झाल्यास पूर्वसंमती नुसार मंजूर आकारमानाचे शेततळ्यासाठी देय असलेले अनुदानाऐवजी त्याचे खालील टप्प्यावरील कमी आकारमानाचे शेततळ्यासाठीचे देय अनुदानाप्रमाणे अनुदान देय राहील व जास्तीचा खर्च हा लाभार्थी शेतक-यांने स्वतः करावयाचा आहे.
  III. वरील (I) व (II) मध्ये नमूद अटी या अशा लाभार्थ्यास मान्य असलेबाबत लाभार्थीची लेखी संमती घेऊन आकारमान बदलास संबंधित तालुका कृषि अधिकारी यांची मान्यता घेणे आवश्यक राहील.

- उपरोक्त मंजूर आकारमानापेक्षा जास्त आकारमानाचे शेततळे घ्यावयाचे असल्यास मंजूर अनुदानापेक्षा जास्त लागणारा खर्च हा लाभार्थी शेतक-याने स्वत: करावयाचा आहे. तथापि देय अनुदानाची कमाल रक्कम रू.७५,०००/- इतकी राहील. रू. ७५,०००/-पेक्षा जास्त खर्च झाल्यास उर्वरित रक्कम संबधित लाभार्थीने स्व: खर्चाने करणे अनिवार्य राहील.
- लाभार्थीस इनलेट आऊटलेटसह/इनलेट आऊटलेट विरहित शेततळ्याचे अनुदान एकाच टप्प्यात अदा केले जाईल.

**अंमलबजावणीतील विविध स्तरावरील जबाबदाऱ्या**

**लाभार्थी**

१. इच्छुक शेतकऱ्यांनी नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पाच्या https://dbt.mahapocra.gov.in या संकेतस्थळावर नोंदणी करून अर्ज सादर करावा. तसेच आवश्यक कागदपत्रे संकेतस्थळावर अपलोड करावीत.
२. शेततळ्याला लागणारी जागा शेतकऱ्याने स्वखुशीने व विनामूल्य द्यावयाची आहे.
३. शेतकऱ्यांनी अर्ज करते वेळी **परिशिष्ट -२** प्रमाणे विहित प्रपत्रातील हमीपत्र ऑनलाइन सादर करणे बंधनकारक राहील.
४. पुर्वसंमती प्राप्त झाल्यानंतर शेततळ्याचे काम **तीन महिन्यात** पूर्ण करणे बंधनकारक राहील. विहित कालावधीत काम पूर्ण न झाल्यास पूर्वसंमती रद्द करण्यात येईल.
५. पूर्वसंमती प्राप्त झाल्यानंतर प्रकल्पाच्या मार्गदर्शक सुचना, तांत्रिक निकषाप्रमाणे शेततळ्याचे काम पूर्ण करणे बंधनकारक राहील.
६. लाभार्थ्याने स्वत:/ मजुराद्वारे/ अन्य पर्यायी साधनांच्या (जेसीबी, पोकलेन सारखे मशिन्स) सहाय्याने शेततळे पूर्ण करावयाचे आहे. याकरीता आवश्यक यंत्रसामुग्री उपलब्ध करुन घेण्याची जबाबदारी संबंधित लाभार्थ्याची राहील. तसेच कामासाठी कोणतीही आगाऊ रक्कम (अग्रीम ) मिळणार नाही.
७. लाभार्थींनी शेततळे खोदकामाच्या निकषाबाबत सहाय्यक कृषि अधिकारी/उप कृषि अधिकारी यांचेकडून मार्गदर्शन/ सूचना घेऊन सदर काम करावयाचे आहे.
८. खोदकाम करतांना सहाय्यक कृषि अधिकारी यांनी निश्चित केलेल्या ठिकाणी शेततळ्याचे खोदकाम करणे बंधनकारक राहील.
९. इनलेट आऊटलेट विरहित शेततळी घेणा-या लाभार्थ्यांकडे शेततळयामध्ये पाणी उचलून टाकण्यासाठी आवश्यक त्या सर्व सुविधा असणे आवश्यक आहे.
१०. पावसाळ्यामध्ये शेततळ्यात गाळ वाहून येणार नाही अथवा साचणार नाही यासाठी व्यवस्था लाभार्थ्याने स्वत: करावी. उदा. प्रवाहाच्या दोन्ही बाजूने तुराटया/पराटयाचे आवरण करुन संरक्षण देणे, इनलेट आऊटलेट जवळ ३ ते ४ फांदेरी बांध घालणे.
११. शेततळ्याच्या बांधावर व पाण्याच्या प्रवाहाच्या भागामध्ये स्थानिक प्रजातीच्या वनस्पतीची लागवड करावी आणि शेततळ्याची निगा, दुरूस्ती व गाळ काढणे इ. ची जबाबदारी संबंधीत लाभार्थीची राहील.
१२. लाभार्थ्यांनी शेततळे खोदकाम झाल्यानंतर काम पूर्णत्वाचा दाखला **परिशिष्ट-४** , आवश्यक कागदपत्रे स्वसाक्षांकित करून डीबीटी पोर्टलवर अपलोड करावीत.
१३. प्रकल्प स्थळी ४ X ३ फूट आकाराचा फलक लावून त्यावर “नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पाच्या अर्थसहाय्याने ”असे नमूद करुन शेतकऱ्याचे नाव, गाव, सर्वे नं., शेततळ्याचे आकारमान, वर्ष, एकुण खर्च रक्कम, अर्थसहाय्याची रक्कम इत्यादी तपशील नमूद करावा.
१४. नैसर्गिक आपत्तीमुळे शेततळयास कोणत्याही प्रकारची हानी पोहोचल्यास नुकसान भरपाई अनुज्ञेय राहणार नाही .

**ग्राम कृषि विकास समिती (GKVS)**

१. गावातील इच्छुक शेतकऱ्यांना या घटकांतर्गत बाबींचा लाभ घेण्यासाठीचे अर्ज करणे यासाठी जनजागृती करतील.
२. ऑनलाईन प्राप्त सर्व अर्ज व अपलोड केलेली कागदपत्रे समूह सहाय्यक यांचे मदतीने छाननी करून अर्जाची अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, महिला, दिव्यांग शेतकरी व सर्वसाधारण या प्राधान्यक्रमानुसार लाभार्थी निवड करतील.
३. इच्छुक लाभार्थी यांचे प्राप्त अर्जांच्या पात्र/अपात्रते बाबत निर्णय घेऊन अपात्र अर्जदारांना अपात्रतेबाबत कारणांसह अवगत करतील.
४. अंमलबजावणी करण्यात आलेल्या बाबींचे सामाजिक लेखापरीक्षण करणे.

**समूह सहाय्यक**

१. समुह सहाय्यक हे इच्छिूक लाभार्थी शेतकऱ्यांचे प्रकल्पाच्या https://dbt.mahapocra.gov.in द्वारे अर्ज करून घेतील.
२. शेतकऱ्यांनी ऑनलाईन अर्ज केल्यानंतर शेतकऱ्याने अपलोड केलेल्या कागदपत्रांची छानणी करतील.
३. सर्व ऑनलाईन प्राप्त अर्ज ग्राम कृषि विकास समितीसमोर मान्यतेसाठी सादर करतील व व समितीच्या बैठकीमध्ये झालेल्या निर्णयानुसार पुढील कार्यवाही करतील.
४. ज्या शेतक-याची कागदपत्रांची पूर्तता होत नसेल अशा शेतक-याचे प्रस्ताव पुन्हा शेतक-याच्या लॉग ईन अकाऊंटमध्ये परत (Back To Beneficiary) पाठवतील. याबाबत शेतकऱ्यांना त्यांच्या मोबाईल क्रमांकावर लघु संदेशाद्वारे (SMS) अवगत करण्यात येईल.
५. शेतकऱ्यांना योजनेच्या अटी व शर्ती तसेच घटकाबाबतचे आर्थिक व तांत्रिक निकष समजावून सांगणे.
६. पात्र लाभार्थ्यांना पूर्वसंमती बाबत अवगत करणे.

**सहाय्यक कृषि अधिकारी**

१. अर्जदाराने ऑनलाईन अपलोड केलेल्या कागदपत्रांची छानणी करणे. छाननी करताना शेतकऱ्यांचे ऑनलाईन अर्ज, ग्राम कृषि विकास समिती सभेचे इतिवृत्त, इत्यादी बाबींची छाननी करणे.
२. लाभार्थी शेतकऱ्याने शेततळे किवा भात खाचरातील बोडी या घटकाचा यापूर्वी इतर शासकीय योजनेतून लाभ घेतलेला आहे काय?, याची पडताळणी करून पूर्वसंमती बाबत शिफारस करणे.
३. पात्र अर्जांच्या प्रस्तावित प्रकल्प स्थळाची शेतकऱ्याच्या अर्जामध्ये नमूद सर्वे नं. मध्ये प्रत्यक्ष स्थळ पाहणी करावी, आणि प्रस्तावित जागा निकषानुसार व तांत्रिकदृष्ट्या योग्य असल्याची खात्री करावी.
४. नियोजित प्रकल्प स्थळाचा भौगोलिक स्थानांकित फोटो, आणि तपासणी बाबतचा तपशील स्थळ पाहणी अहवालामध्ये **( परिशिष्ट ३ )** प्रकल्पाच्या DBT App मध्ये नमूद करावा.
५. पाणलोट क्षेत्र, पर्जन्यमान, उपलब्ध अपधाव, जमिनीचा प्रकार इ. बाबी आणि संचालक, मृ.सं.व पा.क्षे.व्य. यांनी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचना व प्रचलित मापदंड विचारात घेऊन सविस्तर अंदाजपत्रक तयार करुन डेस्क २ वरुन तांत्रिक मान्यतेसाठी तालुका कृषि अधिकारी यांना सादर करावे.
६. लाभार्थ्यास पूर्वसंमती प्राप्त झाल्यानंतर शेततळ्याच्या मंजूर आकारमानानुसार खोदकामासाठी प्रत्यक्ष स्थळावर आखणी करून देणे व मार्गदर्शन करणे.
७. लाभधारकाने शेततळ्याचे काम पूर्ण झाल्याचे कळविल्यानंतर झालेल्या कामाची प्रत्यक्ष मोजमापे घेणे.

**उप कृषि अधिकारी**

१. खोदकामाच्या विविध टप्प्यावर भेट देऊन लाभार्थ्यास तांत्रिक मार्गदर्शन करणे.
२. लाभार्थी शेतकऱ्याने शेततळ्याचे काम पूर्ण झाल्याचे (**परिशिष्ट - ४**) प्रमाणे डीबीटी ॲपद्वारे कळविल्यानंतर उप कृषि अधिकारी यांनी सहाय्यक कृषि अधिकारी यांचेकडून झालेल्या कामाची प्रत्यक्ष मोजमापे घ्यावीत.
३. सदरची मोजमापे प्रत्यक्षपणे खात्री करून शेततळ्याचे खोदकाम मार्गदर्शक सूचनेप्रमाणे तांत्रिक निकषानुसार योग्य असल्याबाबत मोका तपासणी करावी.
४. मोका तपासणी करून सोबत दिलेल्या प्रमाणे मोका तपासणी अहवाल (**परिशिष्ट-५**), मापन पुस्तिका, व इतर आवश्यक कागदपत्रे प्रकल्पाच्या DBT App द्वारे अपलोड करावीत.
५. शेततळ्याचे नैऋत्य कोपऱ्यावरून फोटो घेऊन प्रकल्पाच्या DBT App द्वारे अपलोड करावेत.
६. मार्गदर्शक सुचने प्रमाणे अनुदान परिगणना करून प्रस्ताव पुढील डेस्कवर पाठविण्यात यावा.

**मंडळ कृषि अधिकारी**

१. कार्यक्षेत्रामध्ये लाभार्थी निवड व अनुदान अदायगी यासह सर्व कार्यवाही मार्गदर्शक सूचनेनुसार होत असलेबाबत वेळोवेळी पडताळणी करणे.
२. काम सुरू असताना विविध टप्प्यावर भेट देऊन लाभार्थीस तांत्रिक मार्गदर्शन करणे व तांत्रिक निकषाप्रमाणे काम होत असल्याची खात्री करणे.
३. कार्यक्षेत्रामध्ये सदर घटकांच्या अंमलबजावणी बाबत वेळोवेळी आढावा घेणे.
४. मार्गदर्शक सुचनेत नेमून दिल्याप्रमाणे पर्यवेक्षकीय तपासणी करणे.

**तालुका कृषि अधिकारी**

१. सहाय्यक कृषि अधिकारी यांचेकडुन पूर्वसंमती करिता शिफारस झालेल्या प्रस्तावांतील कागदपत्रांची व अर्जाची छाननी करावी.
२. लाभार्थी शेतकऱ्याने शेततळे किवा भात खाचरातील बोडी या घटकाचा यापूर्वी इतर शासकीय योजनेतून लाभ घेतलेला आहे काय?, याची पडताळणी करण्यात यावी.
३. सहाय्यक कृषि अधिकारी यांनी सादर केलेला स्थळनिश्चिती अहवाल व त्याअनुषंगाने अपलोड केलेल्या सविस्तर अंदाजपत्रक यांची तपासणी करण्यात यावी.
४. सदरचा लाभार्थी पूर्वसंमतीस पात्र असल्याबाबत तालुका कृषि अधिकाऱ्यांची खात्री पटल्यानंतर त्यांना वैयक्तिक शेततळे खोदण्यास ऑनलाईन पूर्वसंमती देण्यात यावी.
५. लाभार्थीस वैयक्तिक शेततळे खोदण्यास प्रदान करण्यात आलेली पूर्वसंमती म्हणजेच सदर शेततळ्याकरीता दिलेली तांत्रिक मान्यता असेल.
६. ज्या शेतक-याचे अर्ज / कागदपत्रांची पुर्तता झाली नसेल, यास्तव पुर्ततेअभावी पुर्वसंमती देता येणार नसेल असे प्रस्ताव त्रुटी नमूद करून सहाय्यक कृषि अधिकारी यांना पुन्हा त्रुटी पूर्ततेसाठी परत (Sent Back) पाठवतील.
७. मार्गदर्शक सूचनेनुसार लाभार्थी पात्र ठरत नसल्यास तालुका कृषि अधिकारी अर्ज रद्द (Reject) करतील.
८. मंजूर आकारमानाप्रमाणे खोदकाम करण्यास शेतपरिस्थिती व भूस्तरानुसार मर्यादा आल्यास अशा प्रकरणी तालुका कृषि अधिकारी यांनी स्वतः तपासणी करुन कमी आकारमानाचे काम अंतिम करावे. (तथापि झालेले काम हे किमान या मार्गदर्शक सुचनेत नमूद शेवटच्या आकारमानाच्या म्हणजेच ४४१ घनमीटर इतक्या आकारमानाचे खोदकाम असणे आवश्यक आहे.) अशा प्रकरणी त्याचे खालील टप्प्यावरील आकारमानाचे मापदंडाप्रमाणे अनुदान देय राहील.
९. खोदकामाच्या विविध टप्प्यावर भेट देऊन लाभार्थीस तांत्रिक मार्गदर्शन करणे.
१०. मार्गदर्शक सुचनेत नेमून दिल्याप्रमाणे पर्यवेक्षकीय तपासणी करणे.

**लेखाधिकारी उपविभाग स्तर :**

१. उप कृषि अधिकारी यांनी शिफारस केलेल्या प्रस्तावाची लेखा अधिकारी उपविभाग स्तर हे मुख्यतः खालील बाबींची छानणी करतील. शेततळे सविस्तर अंदाज पत्रक, उप कृषि अधिकारी स्तरावरून अपलोड केलेले मोका तपासणी अहवाल, मापन पुस्तिका, स्थळ पाहणी फोटो, व इतर आनुषंगिक कागदपत्रे.
२. उप कृषि अधिकारी यांनी शिफारस केलेली रक्कम मार्गदर्शक सुचनेनुसार आहे काय याची खातरजमा करतील.
३. प्राप्त प्रस्ताव तपासणी अंती मार्गदर्शक सूचनेनुसार परिपूर्ण असल्यास उप विभागीय कृषि अधिकारी यांचेकडे अनुदान अदायगीसाठी शिफारस करावी.
४. प्रस्तावाच्या छानणी दरम्यान त्रुटी आढळून आल्यास शेरा नमूद करून संबंधीत उप कृषि अधिकारी यांचे कडे त्रुटी पूर्ततेसाठी परत (Back To Stage ) पाठवतील.

**उपविभागीय कृषि अधिकारी :**

१. लेखाधिकारी स्तरावरुन शिफारस झालेले प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर प्रस्तावाची छाननी उपविभागीय कृषि अधिकारी स्तरावर करण्यात येईल व लेखाधिकारी यांनी शिफारशीत केलेल्या अनुदानाच्या रकमेस अंतिम मान्यता देतील.
२. प्रस्तावाच्या छानणी दरम्यान त्रुटी आढळून आल्यास शेरा नमूद करून मागील डेस्क वर सदर प्रकरण त्रुटी पूर्ततेसाठी परत (Back To Stage ) पाठवतील.
३. मार्गदर्शक सुचनेत नेमून दिल्याप्रमाणे पर्यवेक्षकीय तपासणी करणे.

**जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी:**

१. जिल्ह्यामध्ये उपविभाग स्तरावर लाभार्थी निवड व अनुदान अदायगी यासह सर्व कार्यवाही मार्गदर्शक सूचनेनुसार होत असलेबाबत वेळोवेळी पडताळणी करावी.
२. मार्गदर्शक सुचनेत नेमून दिल्याप्रमाणे पर्यवेक्षकीय तपासणी करणे.

**विभागीय कृषि सहसंचालक:**

१. विभागामध्ये लाभार्थी निवड व अनुदान अदायगी यासह सर्व कार्यवाही मार्गदर्शक सूचनेनुसार होत असलेबाबत वेळोवेळी पडताळणी करणे.
२. विभाग स्तरावर झालेल्या कामांची आकस्मिक तपासणी करावी व विहित नमुन्यात पर्यवेक्षकीय तपासणी अहवाल सादर करावा

**क्षेत्रीय तपासणी:-**

वैयक्तिक शेततळे या घटकाच्या प्रभावी अंमलबजावणी करिता सनियंत्रण अधिकाऱ्यांनी खालील नेमून दिलेल्या प्रमाणे तपासणी करावी व तपासणी अहवाल सादर करावा.

| सनियंत्रण अधिकारी | तपासणी टक्केवारी |
|---|---|
| विभागीय कृषि सहसंचालक | ०.५ % |
| नोडल अधिकारी, वि.कृ.स.सं. कार्यालय | ०.५ % |
| जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी | १ % |
| प्रकल्प अधिकारी, जि.अ.कृ.अ. कार्यालय | १ % |
| उपविभागीय कृषि अधिकारी | ५ % |
| तालुका कृषि अधिकारी | २५ % |
| मंडळ कृषि अधिकारी | ५० % |
| उप कृषि अधिकारी/ सहाय्यक कृषि अधिकारी | १०० % |

# परिशिष्ट - १

## अर्ज छाननी विविध स्तर

| अनु क्र. | कार्यवाही प्रक्रिया | स्तर | कालमर्यादा |
|---|---|---|---|
| १. | लाभार्थी शेतकाऱ्याने अर्ज करणे व आवश्यक कागदपत्रे अपलोड करणे | लाभार्थी | - |
| २. | लाभार्थी शेतकाऱ्याने अपलोड केलेली कागदपत्रे व माहिती यांची पडताळणी करणे | समूह सहाय्यक | १० दिवस |
| ३. | ग्राम कृषि विकास समितीची मान्यता घेणे | समूह सहाय्यक ग्राम / कृषि विकास समिती | १० दिवस |
| ४. | लाभार्थी शेतकाऱ्याने अपलोड केलेली कागदपत्रे व माहिती तसेच ग्राम कृषि विकास समितीची मान्यता यांची पडताळणी करणे | सहाय्यक कृषि अधिकारी | १० दिवस |
| ५. | पूर्वसंमती देणे | तालुका कृषि अधिकारी | १० दिवस |
| ६. | अनुदान मागणी करणे | लाभार्थी शेतकारी | ९० दिवस |
| ७. | मोका तपासणी करणे | उप कृषि अधिकारी | १० दिवस |
| ८. | लाभार्थी शेतकाऱ्याने अपलोड केलेली देयके , मोका तपासणी अहवाल व ,इतर अनुषंगिक कागदपत्रे तपासणे व अनुदान शिफारस करणे | लेखाधिकारी (उप विभागीय कृषि अधिकारी कार्यालय) | १० दिवस |
| ९. | अंतिम अनुदान मंजुरी देणे. | उप विभागीय कृषि अधिकारी | १० दिवस |
| १०. | अनुदान वितरण करणे . | प्रकल्प व्यवस्थापन कक्ष | - |

## परिशिष्ट - २

## हमीपत्र

## नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प — वैयक्तिक शेततळे

नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पांतर्गत मी **"वैयक्तिक शेततळे"** या घटकासाठी डीबीटी पोर्टलवर ऑनलाईन अर्ज करीत आहे. योजनेच्या मार्गदर्शक सूचनामधील विहीत अटी व शर्ती मला मान्य असून त्यासाठीचे हमीपत्र मी सादर करीत आहे.

**मी सत्यप्रतिज्ञेवर प्रमाणित करतो/ करते की,**

१. वैयक्तिक शेततळे लाभाकरीता अर्ज केलेली शेतजमीन माझ्या मालकीची असून त्याचा ७/१२ उतारा माझ्या नावे आहे.
२. वैयक्तिक शेततळे लाभाकरीता मार्गदर्शक सूचनांनुसार आवश्यक कागदपत्रे मी प्रकल्पाच्या डीबीटी पोर्टलवर अपलोड करण्यास बांधील आहे.
३. यापूर्वी मी कोणत्याही शासकीय योजनेमधून शेततळ्याकरीता अनुदान घेतलेले नाही अथवा यापुढे घेता येणार नाही याची मला जाणीव आहे.
४. सहाय्यक कृषि अधिकारी यांनी निश्चित केलेल्या ठिकाणी शेततळे घेणे माझ्यावर बंधनकारक राहील.
५. पूर्वसंमती मिळाल्यापासून शेततळ्याचे काम तीन महिन्यात पूर्ण करणे बंधनकारक असल्याची मला जाणीव आहे.
६. वैयक्तिक शेततळे काम पुर्ण करण्यासाठी कोणतीही आगाऊ रक्कम (अग्रीम) मिळणार नाही याची मला जाणीव आहे.
७. शेततळयाच्या आकारमानानुसार व मी केलेल्या कामाच्या मोजमापानुसार शासनाकडून एकूण खर्चाच्या विहीत मर्यादेत अनुदान मिळणार आहे याची मला जाणीव आहे. याबाबत माझी कोणतीही तक्रार असणार नाही. देय शासकीय अनुदाना व्यतिरिक्त येणारा खर्च मी स्वतः करीन.
८. शेततळे खोदाईचे काम मी स्वतः किंवा यंत्र धारकाकडून पुर्ण करून घेईन तसेच देय शासकीय अनुदान माझ्या स्वतःच्या आधार संलग्न बँक खात्यावर जमा होणार आहे याची मला कल्पना आहे.
९. शेततळ्याच्या बांधावर व पाण्याच्या प्रवाहाच्या भागामध्ये स्थानिक प्रजातीच्या वनस्पतीची लागवड करणे बंधनकारक राहील याची मला कल्पना आहे.
१०. शेततळ्याची निगा व दुरूस्ती करण्याची तसेच गाळ काढणेची जबाबदारी माझी राहील.
११. पावसाळ्यामध्ये शेततळ्यात गाळ वाहून येणार नाही अथवा साचणार नाही यासाठीची व्यवस्था मी स्वतः करण्यास तयार आहे.
१२. शेततळयामध्ये पडून जिवीतहानी होऊ नये म्हणून मी शेततळयास स्वखर्चाने कुंपण करून घेईन.
१३. नैसर्गिक आपत्तीमुळे शेततळ्यास कोणत्याही प्रकारची हानी पोहोचल्यास नुकसान भरपाई अनुज्ञेय राहणार नाही याची मला जाणीव आहे.
१४. पुर्वसंमती पत्रामध्ये नमूद प्रकाराचे व आकारमानाचे शेततळे खोदणे माझ्यावर बंधनकारक राहील.
१५. इनलेट आऊटलेट विरहित शेततळयामध्ये पाणी उचलून टाकण्यासाठी आवश्यक त्या सर्व सुविधा उपलब्ध करण्याची जबाबदारी माझी राहील. तसेच अशा शेततळयासाठी प्लॅस्टीक अस्तरीकरण करावयाचे झाल्यास मी स्वखर्चाने/प्रकल्पाच्या अर्थसहाय्याने पूर्ण करीन.
१६. शेततळयाचे काम पूर्ण होताच मी विहीत नमुन्यातील काम पुर्णत्वाचा दाखला डिबीटी प्रणाली द्वारे अपलोड करीन.
१७. शेततळे पूर्ण झाल्यावर शेततळे योजनेचा ४X३ फूट आकाराचा बोर्ड लावणे मला बंधनकारक राहील.
१८. मी घोषित करतो / करते की सदर अर्जामध्ये नमूद केलेली सर्व माहिती माझ्या माहिती व विश्वासानुसार सत्य व अचूक आहे.

**(टिप : सदरचे परिशिष्ट प्रकल्पाच्या DBT ॲपवर उपलब्ध करून दिलेले आहे. त्यामुळे सदरील परिशिष्ट अपलोड करण्यात येवू नये.)**

## ( परिशिष्ट ३ )

**नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पांतर्गत वैयक्तिक शेततळे या घटकासाठीचे स्थळ पाहणी व जागा तांत्रिकदृष्ट्या योग्य असलेबाबतचा सहाय्यक कृषि अधिकारी यांचा दाखला**

| | | |
|---|---|---|
| १. | सदर अर्ज ग्राम कृषि विकास समितीने (GKVS) बैठकीमध्ये मंजूर केल्याचा दिनांक | |
| २. | प्रस्तावित प्रकल्प स्थळाची लाभार्थी/लाभार्थी प्रतिनिधी यांचे समक्ष पाहणी केल्याचा दिनांक | |
| ३. | लाभार्थीने मागणी केलेल्या शेततळ्याचा प्रकार व आकारमान (घ.मी.) | |
| ४. | लाभार्थ्याच्या शेतकरी आयडी नुसार एकूण क्षेत्र | |
| ५. | शेततळ्यासाठी प्रस्तावित स्थळाचा सर्वे नं./गट नं. | |
| ६. | लाभार्थीने दाखविलेली जागा तांत्रिक दृष्ट्या योग्य आहे काय? | होय /नाही |
| ७. | लाभार्थ्याने यापूर्वी शेततळे घटकाचा लाभ इतर शासकीय योजनेतून घेतलेला आहे काय ? | होय /नाही |
| ८. | स्थळ तपासणीबाबतचे अभिप्राय | |
| ९. | वरील सर्व बाबी विचारात घेऊन सदर लाभार्थ्यास पूर्वसंमती देणेस शिफारस करणेत येत आहे/नाही. | |

शेतकरी वैयक्तिक शेततळे घेण्यास इच्छूक असून क्षेत्रीय पाहणीत शेतकऱ्याने दाखविलेली जागा शेततळे घेण्यास तांत्रिकदृष्ट्या योग्य व पुरेशी आहे.

**स्वाक्षरी/-**

**जागा पाहणी करणाऱ्या अधिकाऱ्याचे नांव :-- ________________________**

**पदनाम :- सहाय्यक कृषि अधिकारी**

**सजा: ________________________**

(टिप : सदरचे परिशिष्ट प्रकल्पाच्या DBT ॲपवर उपलब्ध करून दिलेले आहे. त्यामुळे सदरील परिशिष्ट अपलोड करण्यात येवू नये.)

## परिशिष्ट - ४
## शेतक-याचा काम पूर्णत्वाचा अहवाल
## नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प —वैयक्तिक शेततळे

मी श्री / श्रीमती ------------------------------------------- गांव ---------------------- तालुका --------------------- जिल्हा.--------------------------- असे प्रमाणित करतो / करते की, तालुका कृषि अधिकारी ------------------ यांच्या पूर्व संमतीपत्र क्र. . ------------------- दिनांक / /२० अन्वये मला मंजूर केलेल्या ---------X---------X--------- मीटर या आकारमानाच्या शेततळ्याचे काम आखणी करून देण्यांत आल्या प्रमाणे मी दिनांक --------------------- अखेर १०० टक्के पूर्ण केले आहे.

कृपया, शेततळ्याच्या कामाचे मोजमाप घेऊन त्याची नियमानुसार मापनपुस्तीकेत नोंद घेण्यात यावी. सदर अनुदान माझ्या आधार संलग्न बँक खात्यावर जमा करण्यात यावे, ही विनंती.

दिनांक ---------------------

अर्जदाराची सही / अंगठा
श्री/श्रीमती

## परिशिष्ट - ५

## काम पूर्ण झालेल्या शेततळ्याचा मोका तपासणी व मोजमाप अहवाल

## नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प — वैयक्तिक शेततळे

| | | |
|---|---|---|
| १. | तपासणी दिनांक | |
| २. | लाभार्थीचे नाव | श्री/श्रीमती------------------------------------------ |
| १. | गाव | |
| २. | तालुका | |
| ३. | जिल्हा | |
| ४. | संवर्ग | अ. जाती /अ. जमाती /इतर, अल्प/अत्यल्प/बहू. |
| ५. | वैयक्तिक शेततळे मंजुरीचा तपशील<br>अ) पूर्वसंमती क्रमांक व दिनांक | क्रमांक---------------------<br>दिनांक --------------------- |
| ६. | शेततळे घेतलेल्या शेताचा सर्वे क्रमांक | |
| ७. | मंजूर वैयक्तिक शेततळ्याचे आकारमान (अंदाजपत्रकानुसार ) | लांबी......... X रूंदी......... X खोली ........... (मी.) |
| ८. | प्रत्यक्ष तपासणीनुसार शेततळ्याचे<br>अ) आकारमान<br>ब) घनफळ | <br>लांबी......... X रूंदी......... X खोली ........... (मी.)<br>घनफळ (घ.मी.)- --------------------- |
| ९. | मोका तपासणी वेळी शेततळ्यामध्ये सविस्तर अंदाजपत्रकानुसार आढळलेल्या उणिवा | |
| १०. | **पूर्वसंमती नुसार अनुदानाची रक्कम** | |
| १०. | प्रत्यक्ष तपासणी नुसार शेततळ्यास देय होणारी अनुदानाची रक्कम | रुपये . ---------------------<br>अक्षरी ---------------------------------------------<br>---------------------------------------------- |
| ११. | तपासणी अधिकाऱ्याचे अभिप्राय | |

उपरोक्त प्रमाणे मी नोंदी घेतल्या असून केलेल्या कामानुसार शेततळ्याचे आकारमान --------------- आहे व रक्कम रुपये ----------------- (अक्षरी रु ---------------------------------------------------) इतके अनुदान अदा करण्यास हरकत नाही. सोबत मापन पुस्तिकेची प्रत / झेरॉक्स प्रत जोडली आहे.

सही/- (सहाय्यक कृषि अधिकारी)
नाव :- --------------------------------------
सजा :- --------------------------------------

सही/-
लाभार्थ्याचे नाव :- -----------------------------
उपरोक्त प्रमाणे तपासणी माझ्या समक्ष केली असून घेतलेल्या नोंदी व देय अनुदान मला मान्य आहेत.

दिनांक:-

उपरोक्त वैयक्तिक शेततळे कामाच्या मापन पुस्तकातील नोंदी मी प्रत्यक्षात तपासल्या असून त्या बरोबर आहेत, त्याप्रमाणे लाभार्थी शेतकऱ्यास -------- X ----------- X ---------- मीटर या आकारमानाप्रमाणे रक्कम रूपये ---------------------- (अक्षरी रु. --------------------------------------------------------.) अनुदान अदा करण्यास शिफारस करण्यात येत आहे.

सही/- (उप कृषि अधिकारी)
नाव :- -------------------------------------
सजा :- -------------------------------------

उपरोक्त वैयक्तिक शेततळे कामाच्या नोंदीची मी खातरजमा केली असून त्या बरोबर आढळून आल्या. त्या बरोबर आहेत, त्याप्रमाणे लाभार्थी शेतकऱ्यास -------- X ----------- X ---------- मीटर या आकारमानाप्रमाणे रक्कम रूपये --------------------- (अक्षरी रु. -----------------------------------------
---------------.) अनुदान अदा करण्यास शिफारस करण्यात येत आहे.

सही/- (मंडळ कृषि अधिकारी)
नाव :- -------------------------------------
सजा :- -------------------------------------

## परिशिष्ट – ६

## पर्यवेक्षीय तपासणी अहवाल– वैयक्तिक शेततळे

| | | | |
|---|---|---|---|
| १. | तपासणी दिनांक | | |
| २. | तपासणी अधिकारी | श्री/श्रीमती ______________________________ | |
| ३. | पदनाम | | |
| ४. | तपासणी वेळी उपस्थित इतर अधिकारी/ कर्मचारी | १. श्री/श्रीमती. ___________________________<br>पदनाम ____________________________<br>२. श्री/श्रीमती ___________________________<br>पदनाम ____________________________ | |
| ५. | लाभार्थ्याचे नाव | सर्वे नं./गट न. _________<br>वर्गवारी: ___________ (अ.जा./अ.ज./सर्वसाधारण/इतर)<br>मु.पो. _____________ तालुका : _______________<br>उपविभाग : ____________ जिल्हा :_____________ | |
| ६. | बाब | शेततळे (इनलेट आऊटलेट सह/विरहित) | |
| ७. | प्रकल्पाचे ठिकाण | | |
| ८. | कामाचा कालावधी | | |
| ९. | शेततळ्याचे आकारमान | | |
| १०. | प्रकल्पाचा मोका तपासणी तपशील | १. शेततळे क्षेत्राचा सर्व्हे नंबर/गट क्र. _______<br>२. शेततळयाचे आकारमान<br>लांबी......... X रूंदी......... X खोली ........... (मी.)<br>घनफळ (घ.मी.)- _________ | |
| ११. | लाभार्थ्यास शिफारस करण्यात आलेल्या अर्थसहाय्याची रक्कम रु. | | |
| १२. | तपासणी मध्ये अर्थसहाय्याची परिगणना बरोबर केलेली आहे काय ? | | होय/नाही |
| १३. | नसल्यास तफावत रक्कम रु. | | |
| १४. | मार्गदर्शक सूचनेप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली आहे काय ? | | होय/नाही |
| १५. | लाभार्थ्याचे सर्वसाधारण अभिप्राय | | |
| | | | |
| १६. | गुणवत्तेबाबत तपासणी अधिकाऱ्याचे अभिप्राय | | |
| | | | |

सहाय्यक कृषि अधिकारी/ उप कृषि अधिकारी यांचे मोका तपासणी, मंजूर आराखडा व मार्गदर्शक सूचनेनुसार काम पूर्ण झाले असून त्याबाबत मी स्वत: खात्री केली आहे. मापनपुस्तिकेतील नोंदी योग्य असून त्या प्रत्यक्ष स्थळावर जाऊन प्रमाणित केलेल्या आहेत. सदर कामाचा दर्जा योग्य आहे.

**तपासणी अधिकारी, श्री.**
**पदनाम.**
**(स्वाक्षरी)**

**इतर अधिकारी श्री.**
**पदनाम.**
**(स्वाक्षरी)**

**लाभार्थ्याची/ लाभार्थी प्रतिनिधीची स्वाक्षरी**
**(नाव ....................................................)**